दै. प्रजावाणी दि. 12/05/24

# मोटारसायकल चोरी करणारे दोन जण पोलिसांच्या जाळ्यात

नांदेड, दि. ११ : मोटारसायकलची चोरी करणाऱ्या दोघा जणांना पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. या दोघांकडून पोलिसांनी चोरीच्या मोटारसायकली हस्तगत केल्या आहेत.



जिल्ह्यात मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकांना आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड यांची टीम तयार करुन मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान साईनाथ पुयड व त्यांच्या टीमने मिळालेल्या माहिती आधारे बुद्धभूषण लक्ष्मण सितारे (वय ३०) रा. जयनगर वसमत जि. हिंगोली व साहेबराव मरीबा कांबळे (वय ३५) सांगवी (उमर) ता. देगलूर या दोन संशयीतांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे चोरीच्या मोटारसायकल असल्याचे उघडकीस आले. वजिराबाद ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेलेली बजाज कंपनीची डिस्कवर मोटारसायकल व हिंगोली शहर येथून चोरीला गेलेली होंडा कंपनीची स्प्लेंडर गाडी अशा एकुण दोन मोटारसायकली त्यांच्याकडून हस्तगत केल्या.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सायबर सेलचे पोलीस निरीक्षक गंगाप्रसाद दळवी तसेच पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, आनंद बिच्चेवार, पोलीस अंमलदार माधव केंद्रे, मोतीराम पवार, मारोती मोरे, धम्मानंद जाधव, दीपक पवार, चालक गंगाधर घुगे, हेमंत बिचकेवार, सायबर सेलचे अंमलदार राजु सिटीकर व दीपक ओढणे यांनी ही कामगिरी पार पाडली. याबद्दल पोलीस अधीक्षकांनी या टीमचे कौतुक केले आहे.